**Anekant Journal of Humanities and Social Sciences**
A Half Yearly and Peer Reviewed Open Access Print and Online Journal
http://www.humanitics.org/

**RESEARCH ARTICLE** **Vol.III, Issue I, August, 2020**

# सहमतीच्या राजकारणाचे पुरस्कर्ते : पी.डी.पाटील

**प्रा.हनुमंत फाटक**
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती मो.नं. : ९०४९६५७५४०
ई.मेल : pkhanumant@yahoo.co.in

सातारा जिल्हा हा महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव पाडणारा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्हयाने अनेक नामवंतांना आणि किर्तीवतांना जन्म दिला. त्यापैकीच एक पी.डी.पाटील होते. पी.डी.च्या चौथ्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या कार्य कर्तृत्वाचा त्रोटक आढावा घेण्याचा या ठिकाणी प्रयत्न केलेला आहे.

**पी.डी.पाटील यांचे व्यक्तीमत्व :**

पी.डी.पाटील यांचे बालपण मोठया दारिद्रयात, कष्टात आणि हालअपेष्टांमध्ये गेले. अत्यंत प्रतिकूल परिस्थिती त्यांना मिळालेली असली तरी निसर्गत:च कुशाग्र बुध्दीमत्ता आणि देखण्या तेजस्वी व हजरजबाबी विनोदी वाणीची देणगी त्यांना लाभलेली होती. लहानपणापासून त्यांनी मन, बुध्दी, आणि शरिराची मशागत करून त्यांनी स्वत:चे व्यक्तीमत्व समृध्द, प्रगल्भ आणि सुसंस्कृत बनविले व तशाच प्रकारच्या समाजाच्या बांधणीसाठी जवळपास पन्नास वर्षापेक्षा जास्त काळ ते सार्वजनिक जीवनात कार्यरत राहीले.

प्रतिकूल परिस्थीतीशी संघर्ष करण्याची प्रेरक शक्ती अर्थातच स्वातंत्र्यापूर्वी त्यांच्यात निर्माण झालेली असवी. समतानिष्ठ, न्याय आणि बंधुतापूर्ण समाज बांधणीच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या पी.डी.नी कोल्हापूर विद्यापीठातून एल.एल.बी. ही कायद्याची पदवी संपादन केली. शिक्षण पूर्ण केल्यानंतर पी.डीं.नी काही काळ वकिलीचा व्यवसाय केला परंतू अल्पावधीतच ते वकिलीचा व्यवसाय सोडून शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्राकडे वळले. आपल्या अंगभूत सामर्थ्यानुसार सर्वच क्षेत्रात आघाडी निर्माण करून आपल्या कार्याचा व नेतृत्वाचा ठसा सातारा

जिल्हयावर आणि विशेषत: कराड तालुक्यावर उमटवला. त्यामुळेच सार्वजनिक जीवनात प्रवेश केल्यानंतरची कहाणी मात्र पीडींच्या कर्तृतवाची कराडच्या विधायक विकासासाठी केलेल्या प्रयत्नांची आणि केवळ आंतरिक उर्मीमुळे पदरमोड करून केलेल्या समाजकारण आणि राजकारणाची कहाणी होती.

त्यांच्या राजकीय जीवनात ते एक साधी व सामान्य व्यक्ती म्हणून ओळखले जात. जनसामान्यांविषयी जिव्हाळा व समाजहिताची काळजी ही सतत त्यांच्या मनात असायची. समाजाच्या व्यथांना, प्रश्नांना, इच्छांना किंवा आकांक्षांना वाचा प्राप्त करून देण्यासाठी ते सातत्याने झगडत राहिले. पीडी म्हणजे गोरगरिबां विषयी काळजी असलेले, त्यांच्या सुखदु:खात सहभागी होणारे, समाजहिताच्या नवनवीन कल्पना उचलून धरणारे आणि गांधीवादानुसार आपले आचरण ठेवणारे खऱ्या अर्थाने रयतेचा राजा होते. आपल्याकडे असलेले व्यवस्थापकीय कौशल्य व लोकशाही समाजवादावर असणारी निष्ठा या सर्वांचा उपयोग त्यांनी कराड शहर व कराड तालुक्याच्या विकासासाठी केला. त्यामुळेच कराडच्या सार्वजनिक जीवन व प्रशासनावर पी.डी.पाटील यांच्या व्यक्तीत्वाचा प्रभाव असलेला आजही दिसून येतो. गेल्या पाच दशकांहून अधिक काळ तत्वनिष्ठ, क्रियाशील जीवन जगत असताना तत्वज्ञान, इतिहास, समाजकारण, राजकारण, साहित्य तसेच नाटक, संगित आदी विषयांपैकी कोणताही विषय त्यांना वर्ज्य नव्हता. त्यांची प्रदीर्घ ज्ञानोपासना, प्रखर सत्यशोधन आणि कृतीशिल समर्पित जीवन या सर्वांचे प्रतिबिंब त्यांच्या बोलण्यातून उमटत असे. समाज परिवर्तनाच्या चळवळीत तत्वनिष्ठा व तळमळ यांच्या इतकेच व्यक्तीगत चारित्र्याला व नैतिकतेला महत्व आहे अशी पी.डी.पाटलांची ठाम धारणा होती.

**शैक्षणिक कार्य :**

शिक्षण हे केवळ व्यक्ती विकासाचे माध्यम नसून ते समाजपरिवर्तनाचे एक साधनही आहे. हया विचाराचा संस्कार पी.डी.पाटील यांच्यावर असल्यामुळे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षि वि.रा.शिंदे, यशवंतराव चव्हाण हया महामानवांच्या विचाराचा व कार्याचा आदर्श घेवून त्यांनी आपलं शैक्षणिक कार्य कराडमध्ये विविध संस्थांच्या माध्यमातून उभे केले. समाजातील दलीत, आदिवासी व बहुजन समाजातील स्त्री—पुरूषांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे, या यशवंतराव चव्हाण साहेबांच्या विचाराला मूर्त रूप देण्यासाठी त्यांनी हरतऱ्हेने विधायक प्रयत्न केलेले दिसतात. चव्हाण साहेबांनी स्थापन केलेल्या श्री.शिवाजी शिक्षण संस्थेची विविध महाविद्यालये व शाळांची जबाबदारी पीडींनी समर्थपणे सांभाळली.

**राजकीय कार्य / विचार :**

पन्नास वर्षाहून अधिक काळ पी.डी.पाटील राजकारणात सक्रीयपणे वावरले. एक राजकीय कार्यकर्ता म्हणून वावरत असतांनाच पी.डी.पाटीलांनी स्वत:चे असे एक

वैचारिक व समाजभिमूख व्यक्तीमत्व विकासित केले आणि नेतृत्वाचा एक आदर्श त्यांनी समाजासमोर ठेवला. गेल्या काही वर्षात सार्वजनिक जीवनाची मूल्ये पार बदलून गेलेली आहेत. सत्तापिपासा व पदलोलुपता यांना केवळ नवीन कार्यकर्तेच बळी पडले आहेत असे नव्हे, तर बऱ्याच जुन्या व अनुभवी कार्यकर्ते / पुढाऱ्यांना देखील त्याची बाधा झालेली आहे. अशा या अंधारलेल्या वातावरणात पी.डीं.चे जीवन हे एखाद्या शांतपणे तेवत राहणाऱ्या नंददिपासारखे होते. तेव्हा पी.डी.च्या प्रदीर्घ राजकीय प्रवासाचे सम्यक दर्शन झाले पाहिजे. पी.डी.पाटील यांच्या राजकीय, वैचारिक आणि कृतीशिल जीवनातील उदात्तता, नीतीमत्ता आणि भव्यता ही नव्या कार्यकर्त्याला / पुढाऱ्यांना समजली पाहिजे.

**पी.डी.पाटील मॉडेल :**

सलग चाळीस–बेचाळीस वर्षे कराडचे नगराध्यक्षपद भूषवून त्यांनी एक इतिहासच निर्माण केला होता. त्यांचा मृदू स्वभाव, विरोधकांविषयी असलेली सहनशीलता, निषकलंक राजकीय जीवन व व्यक्तीगत नीतीमत्ता या त्यांच्या व्यक्तीत्वामुळे ते मोठा काळ कराडच्या नागरिकांचा विश्वास संपादन करू शकले. व्यक्तीगत चारित्र्य, विचारसरणी, राजकीय व्यवहार आणि सत्ताकारण या चार गोष्टींमध्ये संतुलन साधणे फार अवघड असते. परंतु पी.डी. पाटील यांनी यातही आपल्या स्वाभाविक व्यक्तीमत्व वैशिष्ठयांमुळे संतुलन साधले. खऱ्या अर्थाने समाजाचा विकास करावयाचा असेल तर सर्व प्रकारचे मतभेद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र आले पाहिजे असे त्यांचे नेहमी म्हणणे असायचे म्हणूनच त्यांनी आपल्या विधायक कार्यक्रमामध्ये, उदिद्ष्ट पूर्तीच्या प्रकल्पात सर्वसामान्य नागरिकां–बरोबरच राजकीय विरोधकानांही सहभागी करून घेण्याचा दिलदार, समंजस असा प्रयत्न केला. त्यांच्या या स्वाभावमुळेच पी.डी.पाटील यांना जनतेचा दीर्घकाळ पाठींबा मिळाला. त्यामुळे त्यांचे प्रशासन कार्यक्षम आणि परिणामकारक ठरले. पी.डी.पाटील यांनी आपल्या चाळीस बेचाळीस वर्षाच्या नगराध्यक्षपदाच्या कार्यकालात नगराध्यक्ष पदाला शोभा आणि प्रतिष्ठा मिळवून दिली. नगराध्यक्षपदाविषयी जनतेच्या मनात आस्था आणि आपुलकी निर्माण केली.

प्रदीर्घ काळ नगराध्यक्षपदावर राहून त्यांनी एक राजकीय आदर्श 'पी.डी.पाटील प्रारूप' या नावाने सर्व समाजासमोर ठेवला आहे. नगरपालिकेत काम करणाऱ्या विखुरलेल्या गटांना एका राजकीय सुत्रात गोवता येणार नाही का ? हा प्रश्न त्यांना नेहमी पडत असे. त्यातूनच त्यांच्या विविध विचारांच्या गटांनी / पक्षांनी एकत्र येवून शहराच्या विकासासाठी एकत्रित काम केले पाहिजे या विचाराची विकास झाला आणि जवळपास चाळीस वर्षे कराड नगरपालिका आघाडीच्या माध्यमातून स्वत:च्या नेतृत्वाखाली चालवून दाखविली. एका अर्थाने पी.डीं.नी कराडच्या नगरपालिकेत काही

प्रमाणात का होईना **गांधीजींच्या स्वप्नातील एकमतावर आधारलेली लोकशाही राबविण्याचा यशस्वी प्रयत्न केला.** त्यांचा हा प्रयोग पी.डी.पाटील प्रारूप म्हणून ओळखला पाहिजे आणि त्यांच्या या कार्याची दखल महाराष्ट्रातील राजकीय विष्लेष्कांनी घेतली पाहिजे असे वाटते.

**पी.डी.पाटील आणि यशवंतराव चव्हाण :**

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर ग्रामीण भागातील बदलेले वास्तव, पंचायत राज्याच्या स्थापनेनंतर गाव, तालुका, जिल्हा पातळीवर निर्माण झालेली सत्ताकेंद्रे आणि सहकार चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रात घडत असलेले मूलग्रामी परिवर्तन हा पी.डी.च्या चिंतनाचा विषय बनला. महाराष्ट्र राज्याचे आर्किटेक्ट आणि कराड नगरीचे सुपुत्र यशवंतराव चव्हाण यांना जेव्हा जेव्हा अधिक शक्तीची गरज होती तेव्हा तेव्हा ती शक्ती कर्तव्यभावनेने दिली पाहिजे असे महाराष्ट्रातील ज्या पुढाऱ्यांना मनापासून वाटत असे त्यात पी.डीं.चा नंबर प्रथम असायचा. पी.डीं.नी यशवंतरावांच्या कार्याचा मोठेपणा आणि प्रतिभेची क्षमता ओळखून आपल्या संपूर्ण राजकीय कारकीर्दीत यशवंतरावांच्या स्वप्नातील समाज घडविण्यासाठी विविध पदांवर असतांना सातत्याने प्रयत्न केले. नगराध्यक्ष पदावरून वा आमदार असतांनाच्या काळात कोणताही निर्णय घेतांना समाजाचे हित आणि यशवंतरावांचा विचार हया दोन कसोटया आधारभूत मानूनच ते निर्णय घेत असत. चालू वर्षे यशवंतराव चव्हाणाचे जन्मशताब्धीवर्षे आहे. त्यांच्या या जन्मशताब्धी वर्षानिमित्त कोणीतरी यशवंतराव चव्हाण व पी.डी.पाटील यांच्यातील संबंधांचे संशोधन करणे गरजेचे आहे. यातून यशवंतराव चव्हाणाच्या काही दूर्लक्षित बाजू समोर आल्याशिवाय राहणार नाहीत.

**सांस्कृतिक व सामाजिक कार्य :**

पी.डी.पाटील साहेबांनी समाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातही मोठे योगदान दिलेले आहे. यशवंतराव चव्हाण यांना अभिप्रेत असणारा समाज घडविण्याच्या उद्देशाने स्थापन केलेल्या 'यशवंराव चव्हाण प्रतिष्ठाण'च्या स्थापनेत त्यांचा महत्वाचा सहभाग होता. प्रतिष्ठाणद्वारे विविध विषयांवर चर्चासत्रे, परिसंवाद, शिबिरे घेऊन सामाजिक प्रबोधन केले. याबरोबरच कराड नरगरपालिकेच्या माध्यमातून पी.डीं.नी सुरू केलेली 'यशवंराव चव्हाण व्याख्यानमाला' ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील एक महत्वाची घटना होती. गेल्या अनेक वर्षापासून सुरू असलेल्या हया व्याख्यानमालातून समाज जागृतीचे व प्रबोधनाचे काम होत आहे. या व्याख्यानमालेत व्याख्याने देण्यासाठी पी.डी.नी महाराष्ट्रातील नामवंत संशोधकांना, अभ्यासकांना निमंत्रित केले. वानगीदाखल काही व्याख्यातांची नावे सांगायची झाली तर गं.बा.सरदार, ग.प्र.प्रधान, डॉ.जनार्धन वाघमारे, भालचंद्र फडके, राम जोशी, डॉ.भा.ल.भोळे, साठे, रावसाहेब कसबे इ. ची दिलेली आहेत. पी.डी. फक्त व्याख्याने घेऊन थांबले नाहीत तर त्यांनी

विविध विषयांवर झालेल्या व्याख्यानांचे डॉक्यूमेंटेशन (पुस्तिकांच्या स्वरूपात) केलेले आहे.

पी.डीं.ना राजकीय मतभेदापेक्षा माणसावरील प्रेम नेहमीच महत्वाचे वाटत होते. अलीकडे माणसातील प्रेमभावना पार आटत चाललेली असतांना पी.डीं.चा हा विचार महत्वाचा ठरतो. समाजाचा विकास हा सामाजिक मूल्यांच्या आधारावरच होत असतो असे मानणारे, सांघीक निर्णयाचे संस्कार करणारे, एकमतावर आधारलेली लोकशाही प्रस्थापित करणारे आणि बहुजन समाजातून वर येवून फुले, शाहु, आंबेडकर, भाऊराव पाटील, महर्षि शिंदे व यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचे ऋण मान्य करणाऱ्या पी.डी.पाटलांना त्यांच्या चौथ्या स्मृतीदिनी माझी ही शब्दरूपी श्रध्दाजंली.

**मराठी संदर्भ:—**


१. *पळशीकर सुहास, २०१०, अनु. चित्रा लेले 'लाकोशाही कोणाची?', व्होराराजेंद्र आणि पळशीकर सुहास, 'भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार',डायमंड प्रकाशन, पुणे— ३०*

२. *सुमंत यशवंत, २००४, 'सामाजिक चळवळीचा परिप्रेक्ष्य आणि महाराष्ट्रांतील चळवळी काही निराक्षणे, पदए भोळे भा. ल. आणि किशोर बेडहिकाळ (संपा. ),'बदलता महाराष्ट्र';चचण२२८.२८६द्ध डॉ. बाबासाहेब आंबडेकर अकादमी. सातारा—०२*

३. *सुमंत यशवंत, २०१८, ' प्रा. यशवंत सुमंत यांची तीन भाषणे', युनिक ॲकेडमी, एप्रिल २०१८*

४. *सुमंत यशवंत, २०१८, ' प्रा. यशवंत सुमंत यांची तीन भाषणे', युनिक ॲकेडमी, एप्रिल २०१८.*

५. *सुमंत यशवंत, २०१८, ' विचारसरणीच्या विश्वात', युनिक ॲकेडमी, एप्रिल २०१८.*

६. *सुमंत यशवंत, २०१८, ' महात्मा गांधींची विचारदृष्टी काही अलक्षित पैलू', साधना प्रकाशन.*

७. *विनोबा भावे, 'गांधी — जसे पाहिले जाणिले विनोबांनी', परंधाम प्रकाशन.*

८. *फडके. य. दि, २००८, 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र, राजकीय इतिहास' १९४०— १९४७,खंड पाचवा, के सागर प्रकाशन,पुणे—३०*